मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली,

डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,

दापोली, जि. रत्नागिरी ४१५ ७१२ (महाराष्ट्र)

ceswakawali@gmail.com & es1974@gmail.com

जा.क्र. मसंकें/प्रअपां/जेसीबी/ /४१७/२०२२ दिनांक :- 8 FEB 2022

प्रति,

---------------------------------------------------

---------------------------------------------------

---------------------------------------------------

**विषय** : पांगारी विभागाअंतर्गत भाडे तत्वावर जेसीबी पुरवठ्याचे दरपत्रक पुरविण्याबाबत....

महोदय,

मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली अंतर्गत असणा—या पांगारी विभागातील प्रक्षेत्रावरील रस्त्यांची डागडुजी करणे, पडलेले चर, खड्डे बुजविणे, खचलेले रस्ते भराव करून बुजवून वापरायोग्य करणे, रस्त्यामध्ये वाढलेली अनावश्यक काटेरी झाडी/झुडपे काढून घेणे, प्रक्षेत्राच्या संपुर्ण कुंपणा भोवती जेसीबीने साफसफाई करून रस्ते व्यवस्थित वापरायोग्य करणेसाठी जेसीबी भाडे तत्वावर घेणेबाबत दरपत्रके सादर करण्याचे आहे.

रस्त्यांचे आकारमान — ६ मि.रुंदी, ६१५० मि.लांबी तसेच प्रक्षेत्राचे सभोवताली ६ किमी व ६ मि.रूंदीचा मार्ग साफ करून व्यवस्थित करावयाचा आहे.

वरील नमूद केल्याप्रमाणे दरपत्रक बंद लखोटयात संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली, ता. दापोली यांचे नावे हात बटवडयाने देण्यात यावेत.

<u>अटी—शर्ती</u>

- दरपत्रक देताना लखोटयावर **"पांगारी विभागातील रस्ते दुरूस्ती व रस्ते साफ सफाई कामासाठी जेसीबी भाडेतत्वावर घेणेबाबत दरपत्रक"** असे स्पष्ट नमूद करावे.
- दरपत्रकावर जीएसटी क्रमांक नमूद करावा. जीएसटी लागू होत नसल्यास तसे प्रमाणपत्र आणि पॅन/आधारकार्डची छायांकित प्रत सादर करावे.
- सदरचे काम आदेशित केल्यानंतर तिन दिवसात पुर्ण करणे बंधनकारक राहिल.त्याचप्रमाणे जेसीबीची संख्या/कामाचे तास वाढविणे/कमी करणे समितीने अधिकार राहुन ठेवले आहेत तसेच समितीचा निर्णय आपल्यावर बंधनकारक राहिल.
- वरील कामाबाबतचे एक किंवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार राखुन ठेवीत आहेत.

- ठेकेदाराने ठेका सादर करण्यापूर्वी प्रत्यक्ष प्रक्षेत्रावर कामाचे स्वरूप पाहूनच दरपत्रकामध्ये दर पती तास अथवा पति दिन असे स्पष्ट सादर करावेत.
- ठेका मंजूरी आदेश प्राप्त होताच मंजूरी पत्रामध्ये दिलेल्या दिनांकापासून निम्नस्वाक्षरीकार/विभाग प्रमुख/प्रक्षेत्र अधिक्षक यांनी दिलेल्या सुचनांनुसार व त्यांचे देखरेखीखाली काम करावयाचे आहे.
- कामाच्या मजुरीची अदायगी पंधरा दिवसानंतर अथवा महिना पुर्ण झाल्यावर करण्यात येईल. संबधित देयक सादर करताना विभाग प्रमुख/प्रक्षेत्र प्रमुख/प्रक्षेत्र अधिक्षक यांचेकडील कामे वेळेत पूर्ण केलेबाबतचा दाखला देयकासोबत जोडणे बंधनकारक राहील.
- ठेका अपुर्ण सोडल्यास ठेक्याच्या बीलाची अदायगी केली जाणार नाही व सदर कामाचा अनुभव पुढील ठेक्याच्यावेळी गृहीत धरला जाणार नाही. तसेच संबंधित ठेकेदाराचे दरपत्रक/निविदा पुढील ठेक्याच्यावेळी ग्राह्य धरले जाणार नाही.
- प्रक्षेत्रावर दिलेल्या सुचनेनुसार करावयाची कामे विभागाच्या सोयी व गरजेनुसार ठेकेदाराने करणे बंधनकारक असेल. सुचनांचा अवमान केल्यास ठेका त्वरीत बंद केला जाईल आणि त्याबाबत ठेकेदाराच्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.
- जेसीबीला अथवा जेसीबी चालकास अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील. कोणताही अपघात झाल्यास त्यासाठी आलेल्या खर्चाची अदायगी या कार्यालयाव्दारे करण्यात येणार नाही.
- सर्वोच्च न्यायालयाने निर्धारीत केलेल्या याचिका क्रमांक SLP-5443/90 नुसार ठेकेदारास किंवा ठेकेदाराने नेमलेल्या मजूरास/इसमास ठेका कालावधीमध्ये/ठेका कालवधी नंतर विद्यापीठ/शासकीय सेवेत कायम स्वरुपी नोकरी मिळण्यास अधिकार राहणार नाही व तसा दाखला देण्यात येणार नाही.
- शासन निर्णयानुसार पध्दतीप्रमाणे ठेकेदाराचे देय्यकातून आयकर कपात करणेत येईल.
- जेसीबीसाठी आवश्यक असलेले इंधन/वंगण व जेसीबीची दुरूस्ती देखभाल याची जबाबदारी ठेकेदाराची जबाबदारी राहील.
- दरपत्रकासोबत संमंतीपत्र स्वाक्षांकीत केलेले असणे बंधणकारक राहील.
- जेसीबी चालकाकडे जड वाहन चालविण्याचा परवाना असणे बंधणकारक राहील.
- आपले दरपत्रक आणि संमंतीपत्र या कार्यालयात दिनांक **16.02.2022** पर्यंत किंवा त्यापुर्वी पोहोचेल असे पाठवावे. विहीत दिनांकानंतर पाप्त होणा-या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही. लखोटयावर **"पांगारी विभागाअंतर्गत जेसीबी कंत्राटी कामे"** असा उल्लेख करुन, लिफाफा मोहोरबंद करून मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली (पांगारी विभाग) यांचे नावे पाठवावा. पोस्टाव्दारे होणा-या विलंबास हे कार्यालय जबाबदार असणार नाही.

आपला विश्वासू,

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली.